MHKO070022292023

# <u>नियमित दिवाणी दावा क्र.१७६/२०२३ निशाणी क्र.२० वर आदेश</u>

## (<u>रंगराव कदम –विरुध्द– विठ्ठल कदम</u>)

प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश १ नियम १० अन्वये हरिभाउ यांची बहीण मुक्ताबाई यांना प्रतिवादी म्हणून समाविष्ठ करुन घेणेकरिता दाखल केला आहे. प्रतिवादी यांनी नि. २२ ला म्हणणे दाखल करुन अर्जास आक्षेप घेतला आहे.

०२. वादी यांचे कथन असे की, प्रतिवादी क्र. १, २ यांनी कैफियतीमध्ये मुक्ताबाई ही हरिभाउ यांची बहिण असल्याचे नमुद केले आहे, परंतु मुक्ताबाई यांनी तिला कायद्याने मिळणारा हिस्सा हरिभाउ यांचे लाभात सोडुन दिला आहे, परंतु दावेस नॉन जॉईंडर ऑफ नेसेसरी पार्टीज ची बाधा येवु नये म्हणुन मुक्ताबाई यांना प्रतिवादी म्हणुन सामील करणे गरजेचे आहे, त्यामुळे दाव्याच्या अंतिम निकालास मदतच होणार आहे. सबब, वादी यांनी या दावेकामी मुक्ताबाई यांना पुढील प्रतिवादी म्हणून सामील करुन घेणेविषयी विनंती केलेली आहे.

०३. प्रतिवादी यांनी नि. २२ ला म्हणणे दाखल करुन कथन केले आहे कि, वादी यांनी दिलेला अर्ज चुकीचा व बेकायदेशिर आहे, अर्जात संयुक्तीक कारण नमुद नाही, वादी यांना सदर बाबीची माहिती असुनही त्यांनी मुक्ताबाई यांना दाव्यात पक्षकार केले नाही, मुक्ताबाई बद्दल वादीने केलेले कथन हे दिशाभुल करणारे आहे, वादी हे विसंगत भुमिका घेत आहेत. सबब, अर्ज नामंजूर करणेविषयी विनंती प्रतिवादी यांनी केलेली आहे.

०४. उभय पक्षकारांच्या विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. प्रस्तुतचा अर्ज निकाली काढण्यापूर्वी मुक्ताबाई या दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश १ नियम १० च्या तरतुदींनुसार आवश्यक पक्षकार आहेत का? हे पाहणे गरजेचे आहे. मुक्ताबाई यांना पक्षकार म्हणून समाविष्ठ करण्याची आवश्यकता ही नक्कीच दावेकामी केलेल्या दादींवर अवलंबून असते. त्याकरीता

मुक्ताबाई यांना समाविष्ठ केल्याशिवाय मागणी केलेल्या दादी देता येणार नाहीत का हे पडताळणे गरजेचे आहे. तेव्हाच सदर पक्षकाराला आवश्यक पक्षकार म्हणता येईल.

०५. अभिलेखाचे अवलोकन केले. प्रस्तुतचा दावा हा वाटप, कब्जा व मनाई साठी दाखल केलेला आहे. वादी यांची बहिण हौसाबाई आहे. हौसाबाई या मयत आहेत. हौसाबाई यांना हरिभाउ व मुक्ताबाई हि अपत्य असल्याचे वादीचे कथन असल्याचे दिसुन येते. वादीच्या कथनावरुन हौसाबाई या मयत आहेत. वादीने दावा हा वाटपासाठी दाखल केलेला आहे. त्यामुळे मुक्ताबाई या आवश्यक पक्षकार असल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येत आहे. वादीने अर्जात केलेले कथन हे सिध्द करण्याची जबाबदारी हि वादीवर आहे. वादीच्या सदरहू विधानावरुनच मुक्ताबाई या दाव्यात आवश्यक पक्षकार असल्याचे दिसून येत आहे. जरी मुक्ताबाई यांना दाव्यात पक्षकार म्हणून सामील केले तर निश्चीतच त्याची मदत दाव्याच्या न्यायनिवाड्याकरीता होणार असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत आहे.

०६. दाव्यातील पुढील गुंतागुंत टाळण्यासाठी तसेच वादी व प्रतिवादी यांच्यातील ख–या वादाच्या मुद्दयावर निर्णय घेण्यासाठी सदर अर्ज मंजूर करणे आवश्यक आहे या निष्कर्षापर्यंत मी येत आहे. त्यामुळे वरील सर्व कारणांचा सारासार विचार करता प्रस्तुतचा अर्ज मंजूर होण्यास पात्र असल्याचे दिसून येत आहे. त्यासोबतच वादी यांना सदर अर्ज दाखल करण्यासाठी लागलेला उशिर किंबहुना मुक्ताबाई यांना दावा दाखल करतेवेळीच पक्षकार न करणे या बाबींसाठी सदर अर्ज मंजुर करताना त्यावर खर्च लावणे योग्य होईल. त्यामुळे मी पुढीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. प्रस्तुत अर्ज (निशाणी २०) रु. ३५०/– खर्चासह मंजूर करणेत येत आहे.

२. सदर खर्चापैकी रु. १५०/– हे प्रतिवादींना देण्यात यावे व उर्वरित रक्कम रु. २००/– हे न्यायालयात जमा करावे.

३. सदर खर्च पुढील तारखेपर्यंत द्यावा. खर्च दिल्यानंतर वादीने आवश्यक ती दुरुस्ती करावी.

AMITKUMAR TRIMBAKRAO MANGIRE
Digitally signed by AMITKUMAR TRIMBAKRAO MANGIRE
Date: 2024.10.23 17:35:08 +0530

दिनांकः– २३/१०/२०२४ (अ.त्रिं. मनगिरे)
जयसिंगपूर. २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर)
जयसिंगपूर.